# प्रेस नोट – सायबर सेल, ठाणे शहर.

## मुंब्रा पो.स्टे. गु.र.नं. I ३६१/२०१७, भा.द.वि.स.क. ४२०, ३४ सह माहिती व तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (सी) ६६ (डी) या गुन्हयात आरोपीतास सायबर सेल, गुन्हे शाखा, ठाणे शहर यांच्याकडुन अटक

मुंब्रा पो.स्टे. गु.र.नं. I ३६१/२०१७, भा.द.वि.स.क. ४२०, ३४ सह माहिती व तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (सी) ६६ (डी) या गुन्हयात अज्ञात आरोपी यांनी मुंब्रा–कौसा भागातील साऊथ इंडीयन बँक व इंडीयन बँक च्या ए.टी.एम. मध्ये डेबीट/केडीट कार्ड स्कॅन करण्याचे स्कीमर व कॅमेरा लावुन सदर एटीएम मध्ये ज्या–ज्या लोकांनी स्वत:चे एटीएम कार्ड वापरून पैसे काढले होते त्यांच्या कार्डचे स्कॅमरद्वारे स्कॅन करून व व्हीडीओ कॅमेराद्वारे पिन नंबर मिळवुन ४९ लोकांचे एटीएम कार्डचे क्लोन करून १९,७५,०००/– रू. काढून घेण्यात आले. सदर प्रकरणी मुंब्रा पोलीस ठाणेस गुन्हा नोंद करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा समांतर तपास सायबर सेल, ठाणे शहर मार्फत करण्यात येत होता.

सदर तांत्रीक तपासात घटनास्थळावरून घेण्यात आलेल्या मोबाईल डाटा व साऊथ इंडीयन बँक व इंडीयन बँक च्या अे.टी.एम. मध्ये लावण्यात आलेल्या सी.सी.टी.व्ही. फुटेज मिळविण्यात आले. सदर मोठया प्रमाणावर प्राप्त मोबाईल नंबरची माहिती व सी.सी.टी.व्ही. फुटेज यांच्यामधील समांतर बाबी यांना एकत्रीत करून तांत्रीक विश्लेषणातुन निष्पन्न होणा–या नवीन माहितीची प्रत्यक्ष त्या ठिकाणी जावुन पडताळणी केली. त्यातुन ४ वोडाफोन मोबाईल कंपनीचे नंबरवर लक्ष केंद्रीत करून त्यातुन मिळणा–या माहितीची प्रत्यक्ष परिस्थितीशी सांगड घालुन खालील नमुद ३ पुरूष व १ महिला आरोपी असे ४ आरोपींना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे करण्यात आलेल्या चौकशीत व सी.सी.टी.व्ही. फुटेजमध्ये दिसुन येणारे चेह–यांशी पडताळणी करून सदरचा गुन्हा करणारे आरोपी हेच असल्याची खात्री झाल्यानंतर सदरचे आरोपींना मुंब्रा पो.स्टे. गु.र.नं. I ३६१/२०१७, मध्ये अटक करण्यात आले आहे.

१) हैदरअली शेरअली सारंग, वय – २० वर्ष, धंदा – वेल्डींग, रा. रू.नं. ८०४, ८ वा माळा, फकीर शहर बिल्डींग, खडी मशिन अमृतनगर, कौसा, मुंब्रा, ठाणे.

२) तबस्सुम अबु बखर मेस्त्री उर्फ जान्हवी उर्फ जोत्स्ना, वय – ३१, गुहिणी, रा. सेंट्रल हाऊस, रू.नं. ४०५, ४ था माळा, नीशान पाडा, डोंगरी, मुंबई.

३) सोहेल उमर शेख, वय – ४४, धंदा – ड्रायव्हर, रा. मन्नतवाला बिल्डींग,रू.नं. २३, डोंगरी चाळ, चार नळ एरीया, मुंबई नं. ०९.

४) मोहंमद जैद फरीद रंगवाला, वय – २९ वर्ष, धंदा – वोडाफोन गॅलरीत नोकरी, रा. ४०/४८, प्रिन्स अली खान बिल्डींग, रू.न. १२, १ ला माळा, सॅन्डहस्ट स्टेशनरोड जवळ, डोंगरी चार नळ, मुंबई नं ९.

सदर गुन्हयात ३ मोबाईल फोन व ३ सिमकार्ड जप्त करण्यात आले असुन स्कीमर व कॅमेरा याचा शोध सुरू आहे. तसेच यात आणखी काही आरोपी निष्पन्न होण्याची शक्यता आहे.

सदरची कामगिरी ही मा. पोलीस आयुक्त, श्री. परम बीर सिंग यांचे निर्देशानुसार मा. पोलीस सह आयुक्त, श्री. मधुकर पान्डेय, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. मकरंद रानडे, मा. पोलीस उप आयुक्त (आर्थिक गुन्हे व सायबर शाखा) डॉ. संदिप भाजीभाकरे, सहा.पो.आयुक्त (आर्थिक गुन्हे व सायबर शाखा) श्री. अवसरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. सदर कारवाईमध्ये व.पो.निरी. एस.बी. सावंत, म.सहा.पो.निरी.अश्विनी पाटील, म.पो.उप निरी.पल्लवी भदाणे, पो.ना ९६६ व्ही.एन. सोनवणे, पो.शि. २५७१ सागर महांगडे, पो.शि. ७१८१ विजयअमर खरटमल, पो.शि. २०७३ राजकुमार राठोड, पो.शि. २५५६ गंगाधर तीर्थकर, पो.शि. २२४२ सचिन घुटे, पो.शि. १८५२ रविंद्र घोडके, पो.शि. ६५९२ अनुरोध गावीत या सायबर सेलच्या अधिकार व कर्मचारी यांनी भाग घेतला आहे.


महाराष्ट्र पोलीस